15-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/14/2025 10:35 PM Page 1



# चावडी, काणकोणात मुसळधार पावसाचा जोर कायम

### रवींद्र भवन परिसरात शेजारील घरात शिरले पाणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १३ :** काणकोणात गेल्या ३ दिवसांपासून होत असलेल्या मुसळधार पावसामुळे चावडी, येथील रस्त्याजवळील रवींद्र भवनाबाहेर आज रोजी, पाणी साचले. सध्याचा ड्रेनेज पाईप जास्त प्रवाह सहन करण्यासाठी खूपच लहान असल्याने, पाणी ओव्हरफ्लो झाले आणि जवळच्या निवासी घरात शिरले, ज्यामुळे कुटुंबाची गंभीर गैरसोय झाली. माननीय सभापती आणि काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांनी स्थानिक नगरसेवक श्री. रमाकांत नाईक गावकर, उपजिल्हाधिकारी श्री. प्रतापराव नाईक गावकर, मामलेदार श्री. गजेश शिरोडकर आणि काणकोणातील पत्रकारांसह तात्काळ घटनास्थळाला आज रोजी भेट दिली.



**चावडी, काणकोण : रवींद्र भवन परिसरातील पावसाळी पाण्यासदर्भात निर्देश देताना सभापती रमेश तवडकर. बाजूला उपजिल्हाधिकारी प्रतापराव नाईक गावकर, मामलेदार व इतर.**

डॉ. रमेश तवडकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पावसाच्या पाण्याचा सुरळीत प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी रवींद्र भवन प्रवेशद्वारापासून तातडीने नवीन आणि रुंद (गटार) ड्रेनेज लाईन बांधण्याचे निर्देश दिले. आतापर्यंत यंदाचा ४० इंच पाऊस झाला असल्याची माहिती दिली आहे.

सभापती व स्थानिक आमदार यांच्या तात्काळ भेटी आणि सक्रिय नेतृत्वाने पुन्हा एकदा जनतेच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्याची व त्यांची वचनबद्धता याक्षणी दर्शविली.

चावडी प्रभागाचे नगरसेवक रमाकांत नाईक गावकर यांनी स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आणि त्वरित पावले उचलली जातील याची खात्री करून, तपासणीला सक्रिय पाठिंबा दिला. यावेळी स्थानिक व माजी उपनगराध्यक्ष दिलीप केंक्रे, विशाल देसाई, बबेश बोरकर, संजय कोमरपंत, शंकर नाईक, आनंदराव देसाई व अन्य उपस्थित होते.

पान १ वरून

### वनहक्क दाव्यांच्या मंजुरीला गती : ३५० हून अधिक प्रकरणे निकाली

असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी वनहक्क दावे डिसेंबर २०२५ पूर्वी निकाली काढण्याचे जाहीर आश्वासन दिले असून, त्याच्या पूर्ततेसाठी प्रशासन विविध टप्प्यात शिबिरे, ग्रामसभा आणि छाननी मोहिमा राबवत आहे. या प्रक्रियेला गती मिळाल्याने वनवासी आणि पारंपरिक जमातींना त्यांच्या हक्कांची साक्षरता प्रत्यक्षात अनुभवता येत आहे.

### तरुणाच्या आत्महत्येनंतर ऑनलाईन जुगाराविरोधात उपाययोजनांची मागणी

त्यांनी गोवा पोलिसांना आणि सायबर क्राइम यंत्रणेला अशा प्लॅटफॉर्मविरोधात कठोर आणि व्यापक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

विधानसभेत विरोधी पक्षांनीही या समस्येवर तीव्र स्वरात चिंता व्यक्त केली. काही सदस्यांनी राज्यात ५०० हून अधिक ठिकाणी ऑनलाइन जुगार सुरू असल्याचा दावा करत दररोज सुमारे ३० कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचे सांगितले. तरुणांचा मृत्यू आणि वाढती आत्महत्या पाहता त्यांनी तातडीच्या कायदेशीर आणि सामाजिक हस्तक्षेपाची मागणी केली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारसमोर सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे आव्हान आहे. तरुणांचे संरक्षण करण्यासाठी कुटुंब, शाळा, समाज आणि सरकार यांना एकत्रित प्रयत्नांची गरज व्यक्त केली जात आहे.

### गोव्यात २३ परदेशी नागरिक बेकायदेशीररित्या वास्तव्यास

पुन्हा एकदा इशारा दिला आहे की, परदेशी नागरिकांना भाडे देताना किंवा राहण्यासाठी जागा देताना सी–फॉर्म त्वरित आणि पूर्णपणे सादर करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. या अटीचे उल्लंघन झाल्यास, संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल.तसेच, कुणालाही अशा प्रकारचे उल्लंघन आढळल्यास, जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा गोवा पोलिसांच्या अधिकृत चॅनेलद्वारे तक्रार नोंदवावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.


**NOTICE**

My Husband **Late Jose Anselmo Pereira** was owning **Honda JAZZ 1.2 CVT Car** bearing **Reg. No. GA-06-E-5172 & Hero Honda Pleasure Scooter** bearing **Reg. No. GA-06-H-6246.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

**Date: 14.6.2025** Sd/-
**Mrs. Maria Coradina De Jesus Fernandes E Pereira**
Flat No. 101,First Floor, Ethelred's Prime Royale, Mangor Hill Vasco-Da-Gama, South Goa 403802

*Sandeep Ads*

**CHANGE IN NAME**

I, **OLIVER SANTAN DA CUNHA**, a resident of H.No. 83, Ambeaxir Sernabatim Colva Salcete South Goa. I would like to change my name from **OLIVER SANTAN D CUNHA** to **OLIVER SANTAN DA CUNHA**. Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **OLIVER SANTAN DA CUNHA**.

**TRANSFER OF VEHICLE**

I**SMT. VIJAYETA VIJAYKUMAR NAIK** wife of **LATE. VIJAYKUMAR NAIK R/o, H.NO. 126/1 GAUTHAN, VELING, MARDOL, PONDA - GOA** would like to transfer the **(HONDA SCOOTER WITHOUT GEAR Bearing Reg. No.GA-05-E-2611)** on my name. Any person having any claim or objection in this re-gards shall intimate to the Asst. Director of Transport **RTO, Ponda** within 15 days from the date of publication of the notice.

SD/- **SMT. VIJAYETA VIJAYKUMAR NAIK**


## दामोदर उच्च माध्यमिक विद्यालयातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** येथे दामोदर विद्यालय इंग्लिश हायस्कूल, पॉप्युलर हायस्कूल आणि महिला आणि नूतन हायस्कूल यांचा समावेश असलेल्या कोम्बा सुपर स्कूल कॉम्प्लेक्सच्या सहकार्याने २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात सदस्य शाळा, निवृत्त शिक्षकेत्तर कर्मचारी आणि शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बाणावली मतदारसंघाचे आमदार कॅप्टन वेंझी व्हेगास उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की सत्कार हा सर्वांसाठी प्रोत्साहनासारखा आहे. शिक्षण हा समाजाचा कणा आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांनी सर्व शिक्षकांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांना यशाचा कोणताही शॉर्टकट नसल्याचा सल्ला दिला.सन्माननीय अतिथी गोवा राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम होते.




या प्रसंगी श्री दामोदर उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयाचे प्राचार्य श्री राजीव देसाई, दामोदर विद्यालय इंग्रजी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री केशव नाईक, पॉप्युलर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुचित्रा राजीव देसाई आणि महिला आणि नूतन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती रिचा कामत उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य श्री राजीव देसाई यांनी उपस्थितांचे स्वागत करून केले ,त्यागनी आपल्या स्वागतपर भाषणात शिक्षक व विद्यार्थी समुहाचे कौतुक केले.त्यानंतर सदस्य शाळा, विद्यार्थी आणि शिक्षणेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे आणि सन्माननीय अतिथींचा परिचय अनुक्रमे शिक्षिका श्रीमती मारिया रेबेलो आणि सर श्री चंद्रकांत शिंदे यांनी केला.या प्रसंगी डॉ. प्रदीप सरमोकादम यांनी भाषण दिले. शिक्षकांनी आयुष्यभर शिकणारे असणे आवश्यक आहे.

शाळेतील प्रतिभेचे आकलन करण्यासाठी आदर्श वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या भाषणात जागतिक तापमानवाढ, प्रदूषण, वाळवंटीकरण आणि जैवविविधतेवर प्रकाश टाकण्यात आला. शिक्षिका परिणिता पोरोबो यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाची सांगता मुख्याध्यापक श्री केशव नाईक यांनी सादर केलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.



**सावईवेरे : सानेगुरुजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना विनय गावकर. बाजूस मृत्युंजय अंगडी व हेमंत कासार.**

## सावईवेरे सरकारी हायस्कूलमध्ये साने गुरुजींची पुण्यतिथी

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १४ :** सावईवेरे येथील सरकारी हायस्कूलमध्ये सानेगुरुजींची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून विनय गावकर, मुख्याध्यापक मृत्युंजय अंगडी, ज्येष्ठ शिक्षक हेमंत कासार उपस्थित होते. सर्वप्रथम 'खरा तो एकचि धर्म' या सानेगुरुजींच्या प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व सानेगुरुजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांनी प्रतिमेला फुले वाहिली. यानिमित्त पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा दोन गटांत विद्यार्थी कथाकथन स्पर्धा घेण्यात आली.पाचवी ते सातवी गटात वेदांत नाईक, शिवांशी सावईकर व वंशिका नाईक तर आठवी ते दहावी गटात अधिरा खांडेपारकर व आचल शिलकर यांना बक्षिसे मिळाली. स्पर्धेचे परीक्षण विनय गावकर यांनी केले. सूत्रनिवेदन भाविका नाईक यांनी केले. स्वागत सरिता माशेलकर यांनी केली तर हेमंत कासार यांनी आभार मानले.

## सेवा संस्थेतर्फे म्हार्दोळ पोलिस स्थानकात रोपटी वितरीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १४ :** पर्यावरण रक्षणासाठी धोणशी– बांदोडा येथील सेवा संस्थेतर्फे दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो व त्या कार्यक्रमाचा विस्तार म्हणून विविध सरकारी शाळा, हायस्कूल, हायरसेकंडरी व कॉलेज कार्यक्रम आयोजित करण्यात येतो तसेच सरकारी आस्थापनांमध्ये उपक्रम राबविण्यात येते या वर्षी केरी – प्रियोळ येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व त्याचा विस्तार म्हणून या वर्षी म्हार्दोळ पोलिस स्थानकात फळंझाडे व औषधी झाडे सेवा संस्थेतर्फे सेवा चे संस्थापक अध्यक्ष श्री मच्छिंद्र शिरोडकर यांच्या हस्ते पोलिस निरीक्षक श्री योगेश सावंत ह्यांना प्रदान केली तसेच त्यांच्या इतर कर्मचाऱ्याना विविध झाडे पुरविली. यावेळी निरीक्षक श्री सावंत ह्यांनी ह्या स्तुत्य उपक्रम राबविण्यात आल्या बद्दल शुभेच्छा दिल्या व सेवा संस्थेला त्यांच्याकडुन सदोदित समाजकार्यासाठी सहकार्य लाभेल असे नमुद केले. यावेळी सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मच्छिंद्र शिरोडकर, संघटन सचिव दत्ता शेट, खजिनदार विरेंद्र शिरोडकर,संयुक्त सचिव गौतम तळावलीकर, केंद्रीय समितीचे सदस्य काशीनाथ परवार, कविता परवार, दिनेश गावडे, ममता गावकर तसेच संस्थेचे प्रियोळ ब्लॉकचे अध्यक्ष दिनेश, उपाध्यक्ष मुकेश, इतर सदस्य गौरेश, सुभाष उपस्थित होते.

## सेवा संस्थेतर्फे प्रियोळ–सावईवेरे रोपटी वितरीत




■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १४ :** पर्यावरण रक्षणासाठी धोणशी– बांदोडा येथील सेवा संस्थेतर्फे दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो व त्या कार्यक्रमाचा विस्तार म्हणून विविध सरकारी शाळा, हायस्कूल, हायरसेकंडरी व कॉलेज्यात कार्यक्रम आयोजित करण्यात येतो तसेच सरकारी आस्थापनांमध्ये उपक्रम राबविण्यात येते या वर्षी केरी – प्रियोळ येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व त्याचा विस्तार म्हणून या वेळी स्वस्तिक हायस्कूल प्रियोळ व केकेरायॅस हायस्कूल,सावईवेरे या हायस्कूलामध्ये विद्यार्थ्यांना सेवा संस्थेचे अध्यक्ष श्री मच्छिंद्र शिरोडकर ह्यांच्यातर्फे रोपटी वितरीत करण्यात आली व पर्यावरण समतोल राखण्यासाठी आमच्यासर्वाकिडुन काय अपेक्षित आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले, डॉ. दिनेश प्रियोळकर ह्यांनी विविध औषधी झाडांची आपल्या जीवनात कशी उपयुक्तता आहे हे यावेळी विद्यार्थ्यांना विस्ताराने सांगितले.

यावेळी सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मच्छिंद्र शिरोडकर, संघटन सचिव दत्ता शेट, केंद्रीय समितीचे सदस्य काशीनाथ परवार,मडकई ब्लॉकचे अध्यक्ष दिनेश गावडे, तसेच प्रियोळ ब्लॉकचे अध्यक्ष डॉ. दिनेश प्रियोळकर, उपाध्यक्ष मुकेश नाईक,मडकई ब्लॉकचे खजिनदार नीलेश गावडे व सदस्य नुतन गावडे हे सर्वजण उपस्थित होते.


**In the Court of Judicial Magistrate No. 1, Chengalpattu**
**FORM No.- 4**
**PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED**
**(Sec. Section 82)**
**CC. No.298/2021**
**CBCID, Metro, Chennai**

WHEREAS complaint has been made before me that Srinivasa Patel, Executive M/s Power Engineering (India) Pvt. Ltd., 58/A, Tuem Indl.Estate, Tuem, Pernam 403 512, Goa has committed for is suspected to have committed the offence of punishable under Section U/s 420 r/w 34 IPC and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said Srinivasa Patel, Executive M/s Power Engineering (India) Pvt. Ltd., cannot be found, and whereas it has been shown to my satisfaction that the said Srinivasa Patel, Executive M/s Power Engineering (India) Pvt. Ltd., has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant):

Proclamation is hereby made that the said Srinivasa Patel, Executive M/s Power Engineering (India) Pvt. Ltd., of is required to appear at 10:30 A.M. before this Court Judicial Magistrate No.1, Chengalpattu to answer the said complaint on the 20th day of June 2025.

Dated, this 23rd day of April 2025 (Place) that he should appear before the Judicial Magistrate No.1, Chengalpattu.

Sd/-
SEAL **Judicial Magistrate No. 1, Chengalpattu**

**In the Court of Judicial Magistrate No. 1, Chengalpattu**
**FORM No.- 4**
**PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED**
**(Sec. Section 82)**
**CC. No.298/2021**
**CBCID, Metro, Chennai**

WHEREAS complaint has been made before me that Ganesh Radhakrishnan, VP-Finance & CFO, M/s Power Engineering (India) Pvt. Ltd. and Man Rollo Power Generation India Pvt. Ltd., 58/A, Tuem Indl.Estate, Tuem, Pernam 403 512, Goa has committed for is suspected to have committed the offence of punishable under Section U/s 420 r/w 34 IPC and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said Ganesh Radhakrishnan, VP-Finance & CFO, M/s Power Engineering (India) Pvt. Ltd. and Man Rollo Power Generation India Pvt. Ltd., cannot be found, and whereas it has been shown to my satisfaction that the said Ganesh Radhakrishnan, VP-Finance & CFO, M/s Power Engineering (India) Pvt. Ltd. and Man Rollo Power Generation India Pvt. Ltd., has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant):

Proclamation is hereby made that the said Ganesh Radhakrishnan, VP-Finance & CFO, M/s Power Engineering (India) Pvt. Ltd. and Man Rollo Power Generation India Pvt. Ltd., of is required to appear at 10:30 A.M. before this Court Judicial Magistrate No.1, Chengalpattu to answer the said complaint on the 20th day of June 2025.

Dated, this 23rd day of April 2025 (Place) that he should appear before the Judicial Magistrate No.1, Chengalpattu.

Sd/-
SEAL **Judicial Magistrate No. 1, Chengalpattu**

Government of Goa
**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR-CUM-SUB REGISTRAR, SALCETE**
Room No. 209, 2nd floor, Mathany Saldhana Administrative Complex, Margao-Goa. Office Tel. No. 9405864458 / Office Email: **crsrsalcete-rd.goa@nic.in**

**No: CR/SR/SAL/1959/2025** **Dated 11/06/2025**

**NOTICE**

Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary, Salcete.

Shri. Pramod Madhu Velip, Jt. Civil Registrar-Cum-Sub Registrar I & II and Special Notary in the said Judicial Division of Salcete, Margao.

In accordance with Section 346(11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceedings Act 2012 it is hereby made public that by Deed of Declaration of Heirship dated 05/06/2025 duly recorded under Book No. 1731 at page 01 to 3V of the office, following is recorded:

That Ana Maria Fernandes, daughter of Piedade Fernandes expired on 14/12/1989 in Margao and her husband Pedro Rodrigues son of late Pascoal Manuel Marcelino Natividade Rodrigues died on 01/06/2015 at H. no. 541, Grand Pulvaddo, Salcete, Benaulim, South Goa, Goa both died intestate and without executing any will or gift or any other disposition of their last wish, but leaving behind their following children/heirs namely (one) Mr. Carmo Zeferino Rodrigues, married to Mrs. Lilia Remediana Lobo (two) Mr. Alexandre Rodrigues married to Mrs. Jenifa Fernandes, as their "sole and universal heirs", there being no one else or no other person or heir who in terms of Law of Succession in force in this State of Goa may prefer the estate left by the deceased persons.

**Any person having objection to this deed may file in this office within one month from the date of its publication.**

Sd/-
Seal (**Shri. Pramod Madhu Velip**)
Special Notary and Jt. Civil Registrar-cum-Sub-Registrar-I & II, Salcete Margao.

*Sandeep Ads*

**Affidavit**

I, Mrs. Aruna Prabhakar Chari, w/o Mr. Prabhakar Chari, age 87 years, married, service, Indian National, resident of H. No. 76, Afonso De Albuquerque Road, near Mahalaxmi Temple, Panaji, North Goa 403001, do hereby solemnly affirm and state as under:

1. I say that I was born on 1st December 1937 at Parxem and my birth has been registered in Office of the Civil Registrar cum Sub Registrar, Tuem, Goa under registration No. 726 with date of registration of 1st May 1956.
2. I say that maiden name as per my Birth Certificate is Anjani.
3. I say that my marriage has been registered in the Office of Civil Registrar, Tuem, under registration No. 215 with date of registration 15th June 1956.
4. I say that my name is changed from Miss Anjani to Mrs. Aruna Prabhakar Chari, but this change is not recorded in my Marriage Certificate.
5. I do not have any photo identity in maiden name Anjani and I wish to change my name from Aruna Prabhakar Chari to Aruna Prabhakar Chari alias Anjani Chari.
6. I say that this Affidavit is done for the purpose of publication in the Official Gazette, Government of Goa for change of my name i.e. Aruna Prabhakar Chari to Aruna Prabhakar Chari alias Anjani and to correct the name on my Aadhaar Card, PAN Card, Passport and EPIC Card etc.

I say that whatever stated above is true and correct to the best of my knowledge and belief and no part of it is false.

Dated 3.3.2025

Sd/- Deponent
Babuso R. Sawant (Notary)
V. No. AP-1868/2025

**Affidavit**

I, Mrs. Nalini Vithal Naik alias Noli Vishnum Naik, w/o Mr. Nilconta Babusso Naique alias Vithal Gondu Naik and d/o Mr. Vishnum Madeva Naik, age 76 years, married, homemaker, Indian National, resident of H. No.. 9, Aquem Baixo, Salcete, Goa 403 707, do hereby solemnly affirm and state as under:

1. I say that I was born on 9th May 1948 at Sancoale and my birth has been registered in Office of the Civil Registrar cum Sub Registrar, Mormugao, Goa under registration No. 274 with date of registration of 10th April 1969.
2. I say that maiden name as per my Birth Certificate is Noli Vishnum Naik.
3. I say that my marriage has been registered in the Office of Civil Registrar, Salcete, under registration No. 318 with date of registration 30th April 1969.
4. I say that my name is changed from Miss Noli Vishnum Naik to Mrs. Nalini Vithal Naik, but this change is not recorded in my Marriage Certificate.
5. I do not have any photo identity of maiden name Noli Vishnum Naik and I wish to change my name from Nlini Vithal Naik to Nalini Vithal Naik alias Noli Vishnum Naik.
6. I say that this Affidavit is done for the purpose of publication in the Official Gazette, Government of Goa for change of my name i.e. Nalini Vithal Naik to Nalini Vithal Naik alias Noli Vishnum Naik and to correct the name on my Aadhaar Card, PAN Card, Passport and EPIC Card etc.

I say that whatever stated above is true and correct to the best of my knowledge and belief and no part of it is false.

Sd/- L.H. T. I. Deponent
Noel Parras D'Cruz (Notary)
V. No. AP-1869/2025


## बाये सुर्लात मुख्यमंत्र्यांनी साधला मतदारांशी संवाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** सोळा ते अठरा तास अविश्रांत काम करणारे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी आगामी बिधानसभा निवडणुकीसाठी मतदारसंघात सातत्याने लोकांशी कनेक्ट होताना सातत्याने कार्यकर्त्यांनी संपर्क वाढवला आहे.

देशात नरेंद्र मोदी यांच्या भाजप सरकारला अकरा वर्षे पूर्ण झाल्याने साखळी मतदारसंघात पन्नास ही मतदान बूथवर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या मार्गदर्शनखाली 'बूथ चलो अभियान' कार्यक्रमात राबवण्यात येत असून आज बुधवारी बाये सुर्ला बूथ क्र. ३४ वर बूथ चलो अभियान अंतर्गत कार्यक्रमचे आयोजन करण्यात आला होता, त्यात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बूथ क्र ३४ च्या मतदारांशी संवाद साधला, त्यांच्या वयक्तिक समस्या जाणून घेतल्या.



**बाये–सुर्ल : 'बूथ चलो अभियान' अंतर्गत कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री डॉ. सावंत. बाजूला इतर.**

साखळी मतदारसंघातचा विकास साधतानाच या बाये सुर्ल परिसरात भाजप सरकारने विविध विकासकामे पूर्ण केली आहे. विविध योवजना असो या नोकरी यात ही जास्त कामे या परिसरातील लोकांची झाली आहे. तरीही या भागात आम्हाला हवा तसा साथ निवडणुकीत होत नाही हे, असे का होते. असा प्रश्न मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मतदारांकडे उपस्थित केला. व वयक्तिक समस्या मतदारांच्या जाणून घेतल्या व मतदारांना समाधानी केले. कोणतीही अडचण असूदे बे धडक आपल्याकडे या, असे ही मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी मतदारांना सांगितले.

यावेळी जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लकर, सरपंच साहिमा गावडे, मंडळ अध्यक्ष रामा नाईक, मंगलदास उसगावकर स्थानिक पंच दिनेश मडकईकर, बूथ अध्यक्ष सुदेश गावडे भाजप कार्यकर्ते व या बूथवरील मतदार उपस्थित होते. 'सबका साथ सबका विकास' या धरतीवर सर्व मतदारना मुख्यमंत्री भेटणार असून त्यांच्या समस्या ते जाणून घेणार आहेत. विकसित भारत का खरा आधार असून बुथ कार्यकर्ता हा पक्षाचा शिलेदार आहे. त्यामुळे या बूथ कार्यक्रमात मोट्या उत्सहात कार्यकर्ते हितचिंतक सहभागी झाले होत. घरो घरी या कार्यक्रम विषयी माहिती देण्यात येणार आहे. सूत्रसचालन निलेश नाईक यांनी केले.

# राधाकृष्ण विद्यालयातर्फे वृक्षारोपण कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** राधाकृष्ण विद्यालय, डिचोली एनसीसी युनिट ९/१ व १ गोवा बटालियन एनसीसी – पणजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डिचोली नगरपालिकेच्या सहकार्याने, शनिवारी डिचोली फिश मार्केट येथे वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये पर्यावरण रक्षणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि हरित कृतीला प्रोत्साहन देणे हे होते. यावेळी मुख्य अतिथी रमेश गावस – राष्ट्रीय पर्यावरणतज्ज्ञ व राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त,




**डिचोली : राधाकृष्ण विद्यालयातर्फे डिचोली मार्केट परिसरात झाडे लवण्यात आली. यावेळी रमेश गावस, विजय नाटेकर, रयू फ खान पठाण, वर्षा धूपकर व इतर.**

सन्माननीय पाहुणे विजयकुमार नाटेकर – अध्यक्ष, डिचोली नगरपालिका,

विशेष निमंत्रित रामचंद्र पळ – प्रमुख, स्वच्छता दूत – त्यांची टीम, विशेष उपस्थिती श्री. वेंकटेश नाटेकर, कॅझेटन वाझ, उदय डिचोलकर, बाळकृष्ण बांदेलार आणि मितेश गुणकर – कला शिक्षक, राधाकृष्ण विद्यालय आदी उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी राधाकृष्ण विद्यालय डिचोली एनसीसी युनिटच्या उपक्रमाचे कौतुक केलेव वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन व टिकाऊ जीवनशैलीबाबत एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन केले.

रमेश गावसयांनी सांगितले की, प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे की, नियमितपणे झाडे लावावीत, जपावीत आणि पर्यावरणाचे रक्षण करावे. विजयकुमार नाटेकर यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे आणि ते योग्यप्रकारे वाढेपर्यंत त्याची काळजी घ्यावी.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका वर्षा धुपकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. एनसीसी अधिकारी चीफ ऑफिसर रऊफखान पठाण यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले व आभार प्रदर्शनही केले. एनसीसी कॅडेट्सनी जोशपूर्वक सहभाग घेत झाडें लावली आणि पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली, ज्यामुळे हा दिवस प्रेरणादायी आणि लक्षात राहणारा ठरला.